**सन २०२५-२६ मधील प्राप्त तरतूदीचे वितरण करणेबाबत.**
**छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्र. अर्थसं.११२५/प्र.क्र.२६६/२-स**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ३१ मार्च, २०२६

**<u>संदर्भ</u> :-** १) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्र. कृकमा ०६१७/प्र.क्र.१२७/२-स, दि. २८.०६.२०१७.
२) मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचा दि. २७.०९.२०२२ रोजीचा आदेश
३) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचे पत्र क्र.कृषीपत.०६/छशिमसयो/वितरण/२०२६/५०५, दि. ०६.०३.२०२६

**प्रस्तावना :-**

राज्यामध्ये सततच्या दुष्काळ व नापिकीमुळे कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ ही योजना राबविण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत लाभास पात्र असलेल्या ५०.६० लाख पात्र खात्यांपैकी ४४.०४ लाख खातेदारांना लाभ देण्यात आला असून उर्वरित पात्र असलेल्या ६.५६ लाख कर्जखात्यांना लाभ देणे बाकी आहे. या योजनेअंतर्गत पात्र असून लाभ न मिळाल्यामुळे काही शेतकरी / सहकारी संस्थांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद तसेच खंडपीठ नागपूर येथे विविध रिट याचिका दाखल केल्या आहेत. सदर रीट याचिकांमध्ये संबंधीत याचिकाकर्त्यांना तसेच अन्य पात्र खातेदारांना योजनेचा लाभ देण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने शासनास आदेश दिले आहेत.

मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने या योजनेअंतर्गत पात्र असलेल्या उर्वरित कर्जखात्यांना लाभ अदा करण्याकरीता रु. ५९७५.५१ कोटी इतका निधी पूरक मागणीव्दारे मंजूर करण्याबाबत प्रस्ताव डिसेंबर, २०२५ च्या अधिवेशानामध्ये सादर करण्यात आला होता. त्यानुसार विभागाने मागणी केलेल्या निधीपैकी या योजनेकरीता रु. ५००.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ अंतर्गत उपलब्ध झालेला रु. ५००.०० कोटी निधी उर्वरित पात्र कर्जखात्यांना वितरीत करण्याबाबत प्रस्ताव सादर केला असून सदर निधी वितरणाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील कार्यक्रम खर्चाच्या योजनेअंतर्गत पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आलेला रु. ५००.०० कोटी इतका निधी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ (राज्यस्तर) (२४३५ ००८२) या योजनेअंतर्गत ३३- अर्थसहाय्य या बाबीकरीता वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२.	सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी संदर्भ क्र.३ येथील दिनांक ०६.०३.२०२६ रोजी सादर केलेल्या प्रस्तावानुसार सोबत जोडलेल्या **प्रपत्र "अ" व प्रपत्र "ब"** मधील बँका व विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या पात्र खातेदारांना प्रचलित नियम व विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन पध्दतीने निधीचे वाटप करावे. तथापि, निधी वाटप करत असताना ग्रीन लिस्ट नुसार पात्र असणाऱ्या कर्जखात्यांनाच लाभ अदा होईल याबाबची दक्षता सहकार आयुक्त कार्यालयाने घ्यावी.

३.	सदर तरतूद खर्च करण्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त सहाय्यक निबंधक (अंदाज व नियोजन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच लेखाधिकारी, अधीन सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे. सदर निधी आहरण करुन वेळेत खर्च होईल याची दक्षता सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी घ्यावी. तसेच या बाबतचा अहवाल व खर्चाची माहिती वेळोवेळी शासनास सादर करावी.

४.	सदर खर्च मागणी क्रमांक व्ही-०२, २४३५- इतर कृषिविषयक कार्यक्रम, ००, ६०- इतर, १०१—शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी योजना, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ (राज्यस्तर) (२४३५ ००८२)-३३ अर्थसहाय्य (दत्तमत) या लेखाशिर्षाखाली सन २०२५-२६ या वर्षासाठी उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून खर्च करण्यात यावा.

५.	सदर शासन निर्णय, वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्रमांक २०६/२०२६/व्यय-२, दिनांक १७.०३.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०३३११७५९०७११०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH ARUN PATIL

Digitally signed by SANTOSH ARUN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=CA78467BCC4594E1E11741A7962A7A83FEAFB176442575037160FC343C4AE5AB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E52439642AB57C332B2A3E3E46F0D907BA6167409EF6D52C943BF775ECF042FD, cn=SANTOSH ARUN PATIL
Date: 2026.03.31 18:00:34 +05'30'

**(संतोष पाटील)**
**अपर निबंधक तथा सहसचिव,**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
३) महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) महाराष्ट्र-२, मुंबई.
४) अधिदान व लेखा अधिकारी, पुणे.
५) निवासी व लेखापरिक्षा अधिकारी, पुणे.
६) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
७) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).
८) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).
९) वित्त विभाग (अर्थसंकल्प-१३/ व्यय-२), /, मंत्रालय, मुंबई.
१०) अवर सचिव (कार्यासन १७-स), सहकार, पणन वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) निवडनस्ती (कार्यासन २-स).

## प्रपत्र-अ

(रक्कम रुपये लाख)

| अ.क्र. | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | कर्जमाफी (रु. १.५० लाखापर्यंत) | | ओटीएस (रु. १.५० लाखावरील) | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जखाती संख्या | रक्कम | कर्जखाती संख्या | रक्कम | कर्जखाती संख्या | रक्कम |
| १ | नागपूर | ३६३९ | २४७२.६३ | ६५०७ | १०५८८.७० | १०१४६ | १३०६१.३३ |
| २ | वर्धा | ११०८१ | ५१२८.९० | ७३५ | ९०५.७२ | ११८१६ | ६०३४.६२ |
| ३ | बुलडाणा | ४५४९ | २०४८.९६ | ५५७४ | २७८४.६४ | १०१२३ | ४८३३.६० |
| ४ | धुळे-नंदुरबार | ३६३९ | १६९९.४७ | ४२१ | ११३२.१४ | ४०६० | २८३१.६१ |
| ५ | जालना | १९४१ | ४२४.२६ | १४०६ | ४६३.५६ | ३३४७ | ८८७.८२ |
| ६ | नाशिक | १८२३ | १०५०.०८ | १९७२४ | १४८९७.१५ | २१५४७ | १५९४७.२३ |
| ७ | धाराशिव | १२३० | ६१४.६१ | १३६० | ८६०.४६ | २५९० | १४७५.०७ |
| ८ | नांदेड | १९७४ | १०६०.४३ | ११५३ | ३६१.६८ | ३१२७ | १४२२.११ |
| **एकूण** | | **२९,८७६** | **१४४९९.३४** | **३६,८८०** | **३१९९४.०५** | **६६,७५६** | **४६४९३.३९** |

******

## प्रपत्र-ब

| अ.क्र. | जिल्हा | विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे नाव | संलग्न बँकेचे नाव |
|---|---|---|---|
| १ | लातूर | रेनापूर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., ता. रेनापूर | सेंट्रल बँक ऑफ इंडीया |
| २ | रायगड | वरसोली विविध कार्यकारी सहकारी संस्था लि., | बँक ऑफ इंडिया |
| ३ | रायगड | वडगाव विविध कार्यकारी सहकारी संस्था लि. | बँक ऑफ इंडिया |
| ४ | नाशिक | सेंट्रल गोदावरी कृषक सहकारी संस्था., मर्या, गंगापूर | सेंट्रल बँक ऑफ इंडिया |
| ५ | नाशिक | गोदा युनियन कृषक सहकारी संस्था मर्या., सिन्नर | युनियन बँक ऑफ इंडिया |
| ६ | सोलापूर | शुगरकेन प्रोड्युसर विकास संस्था माळीनगर, ता. माळशिरस | सेंट्रल बँक ऑफ इंडिया |
| ७ | पुणे | शिरोळी सेवा संस्था., मर्या., जुन्नर | बँक ऑफ इंडिया |
| ८ | सातारा | काळगंगा कृषक सेवा सहकारी संस्था मर्या., तारळे, ता. पाटण | बँक ऑफ इंडिया |
| ९ | छत्रपती संभाजी नगर | अडगाव बु. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., ता.छत्रपती संभाजीनगर | सेंट्रल बँक ऑफ इंडिया |
| १० | छत्रपती संभाजी नगर | सातारा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., ता. छत्रपती संभाजीनगर | सेंट्रल बँक ऑफ इंडिया |
| ११ | छत्रपती संभाजी नगर | निपाणी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., ता.छत्रपती संभाजीनगर | सेंट्रल बँक ऑफ इंडिया |
| १२ | छत्रपती संभाजी नगर | हरसूल विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या | सेंट्रल बँक ऑफ इंडिया |
| १३ | छत्रपती संभाजी नगर | पैठण विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या | स्टेट बँक ऑफ इंडिया |
| १४ | जालना | युनियन कृषक सेवा सहकारी संस्था मर्या., पूर्णा | महाराष्ट्र ग्रामीण बँक |
| १५ | परभणी | काटनेश्वर विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., पूर्णा | महाराष्ट्र ग्रामीण बँक |
| १६ | परभणी | माटेगाव विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., पूर्णा | महाराष्ट्र ग्रामीण बँक |
| १७ | परभणी | पिंपळगाव बु. विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., पूर्णा | महाराष्ट्र ग्रामीण बँक |
| १८ | हिंगोली | नरसापूर विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., | महाराष्ट्र ग्रामीण बँक |
| १९ | हिंगोली | तरोडा विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., | महाराष्ट्र ग्रामीण बँक |
| २० | हिंगोली | शिंगणापूर विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. | महाराष्ट्र ग्रामीण बँक |
| २१ | नांदेड | विविध कार्यकारी संस्था मर्या. वाडी बु., ता. नांदेड | स्टेट बँक ऑफ इंडिया |
| २२ | बुलढाणा | गांगलगाव विकास सहकारी संस्था मर्या., ता. चिखली | सेंट्रल बँक ऑफ इंडिया |

****